www.livemaharashtra24x7.com

# LIVE महाराष्ट्र 24x7

● खाजगी वितरणासाठी

●विशेषांक संपादक : सचिन लिला सुखदेव अंभोरे

●छत्रपती संभाजीनगर ●शुक्रवार, दि. १२ जानेवारी २०२४ ●पाने ८

राष्ट्रीय युवा विशेष

# युवा नेतृत्व

मंजिले उन्हीं को मिलती है,
जिनके सपनों में जान होती है,
पंखो से कुछ नहीं होता,
हौसलों से उड़ान होती है








जिजाऊंच्या लेकी



कापूसवाडी ते छत्रपती संभाजी नगर...
●पान ३ वर...


सामाजिक कार्यातील 'युगंधर'
●पान ४ वर...


क्राफ्टीस्ट अँड आर्टिस्ट
●पान ५ वर...


माँसाहेब जिजाऊ स्मारकाचे ऐतिहासिक प्रवेशद्वार
●पान ६ वर...


स्वप्न पूर्ण करण्यासाठी रात्रीचा दिवस....
●पान ७ वर...


जिजाऊचे युवक...?
●पान २ वर...


युवकांनो जागे व्हा..!
●पान २ वर...


## १२ जानेवारी, शुक्रवार रोजी

●राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती आणि राष्ट्रीय युवा दिनानिमित्त छत्रपती संभाजी नगर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

सकाळी ९ वा.

●**स्थळ** : जिजाऊ चौक ( केंब्रिज स्कूल ) जालना– छत्रपती संभाजीनगर रोड. राजमाता माँसाहेब जिजाऊंना अभिवादन, ढोलताशा वाजून मान्यवरांचे स्वागत, सामाजिक व परिसरातील मान्यवरांचा सत्कार, शाहिरी पोवाडा, राजमाता माँसाहेब जिजाऊ वरती आधारित गायन, जिजाऊ सृष्टी सिंदखेडराजा येथे जाणाऱ्या शिवभक्तांसाठी अल्पोहार. निमंत्रक : विजय औताडे पाटिल, अध्यक्ष, राजमाता जिजाऊ उत्सव समिती २०२४ व आत्माराम शिंदे पाटील, संस्थापक अध्यक्ष, राजमाता जिजाऊ उत्सव समिती २०२४

## सकाळी ९ वाजता

●**स्थळ** : क्रांती चौक ते राजमाता जिजाऊ चौक

पितृतीर्थ स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांना वंदन करून मशाल रॅली घेऊन क्रांती चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून महावीराट बाईक व कार अभिवादन रॅली...

●**आयोजक** : स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ सार्वजनिक जयंती महोत्सव समिती, छत्रपती संभाजीनगर.

"जो संकटांशी, अडी– अडचणींशी, समस्यांशी, सतत झुंज द्यायला तयार आहे, ज्याच्या डोळ्यात साहसाचे तेज चमकते तोच खरा युवक'' आणि म्हणूनच या साहसाचे प्रतिबिंब अभिव्यक्त होण्यासाठी आम्ही साजरा करतोय राष्ट्रीय 'युवक दिन' लाईव्ह महाराष्ट्र च्या 'युवा नेतृत्व' या विशेषांकातून............

स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन १२ जानेवारीस भारतात राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा होतो. तसेच राजमाता यांचाही जन्मदिवस आहे. देशातील सर्वसाधारण १५ ते ३५ वयोगटांतील सर्वच युवक – युवती हे देशाच्या उन्नतीचा खरा आधार आहेत. युवक म्हटलं की, जो कसलेही आव्हान स्वीकारून तडीस नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो. ज्याच्यात धैर्य, धाडस बरंच काही जाणून घेण्यास, करण्यास उत्सुक असतो. प्रेम करतो, प्रेम स्वीकारतो मात्र सहजासहजी परिस्थितीशी जुळवून घेत नाही. अशा युवकांनी आपल्यातील नेतृत्व क्षमता निर्माण करून समाजात आपले एक वेगळे वर्चस्व निर्माण केले आहे. आणि याच युवकांचे धाडसी प्रतिबिंब आज लाईव्ह महाराष्ट्र च्या 'युवा नेतृत्व' या विशेषांकात साकारतोय याचे समाधान वाटते...

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, शिक्षण, वैद्यकीय, अभियांत्रिकी यासह अनेक विविध क्षेत्रांत आपले नेतृत्व सिद्ध करणाऱ्या युवकांची यशोगाथा आपल्याला नक्कीच प्रेरणादायी ठरेल.... आजच्या युवकांना उभारी देण्याचा एक प्रयत्न... राष्ट्रीय युवादिनाच्या शुभेच्छांसह..

**सचिन लिला सुखदेव अंभोरे**
(विशेषांक संपादक)

LIVE महाराष्ट्र 24x7
●छत्रपती संभाजीनगर
●शुक्रवार, दि. १२ जानेवारी २०२४





# जिजाऊंचे युवक...?

राष्ट्रीय युवा दिन

राखी विष्णू तांबट

जगाची आई अशी 'जिजाऊ' एक धाडसी स्त्री.. स्त्री सन्मानाचं बाळकडू देणारी...! हेच धडे गिरवणारे छत्रपती शिवाजी महाराज आपले आदर्श म्हणून त्यांना आपण आपले दैवत मानतो आणि युवकांमध्ये तर शिवाजी महाराजांचे वेड आहे. पण हे वेड फक्त शिवजयंतीलाच उफाळतं...अन दुसऱ्या दिवशी जिजाऊंचे, शिवाजी महाराजांचे तत्त्व, त्यांचे विचार कुणालाच आठवत नाहीत.

सांगण्याचा मुद्दा हाच की, स्त्री सन्मानाचा धडा या कलियुगात पार गाळला गेलाय.. नर्स अरुणा शानबाग असो, दिल्लीतली निर्भया असो किंवा हैदराबाद मधील प्रियंका आणि असंख्य कारणांमुळे दाबल्या गेलेल्या बलात्कार केसेस असो, भारतात बलात्काराच्या प्रमाणाचा आलेख तीव्रतेनं वाढताना दिसतोय मग कुठे जातेय जिजाऊंची शिकवण..? प्रेमाला होकार दिला नाही की, ॲसिड फेक हल्ला होतो, स्त्रीला मिळणारे दुय्यम मानून, आणि तिला अबला समजून अत्याचार करणारी अघोरी 'पुरुषी' मानसिकता खरंतर कुठेतरी बदलायला हवी...

कैक कायदे झाले, पण बलात्कारांचं प्रमाण थांबता थांबेना... बलात्काऱ्यांना सात-आठ वर्षांत तारीख पे तारीख कोर्टात दिली जाते, तर कधी कधी पाठीशी घातल्या जातं..आणि न्याय खरी श्रद्धांजली फक्त कॅन्डल मार्च अन हॅशटॅगनेच देण्याचा ट्रेंड खरंच बदलायला हवा..आज युवक दिन...अनेक युवक आपल्या प्रगतीने अवकाश कवेत घेतायत. असंख्य गोष्टी शक्य करण्यासाठी पुढे सरसावतायत परंतु बलात्कार, खून, छळ, शोषण यासारखे अनेक गुन्हे युवकांकडून घडत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुलेंचा ऐतिहासिक वारसा लाभलेला आपला देश आज युवकांच्या बेरोजगारीची समस्या आणि युवकांकडून घडणाऱ्या बलात्कारासारख्या समस्यांनी ग्रासलेले आहे. जिजाऊंच्या स्वप्नातला भारत असा नक्कीच नसावा...

त्यामुळे फक्त जयंती आणि युवक दिन साजरा करण्याऐवजी जिजाऊंचे विचार आत्मसात करून त्याची अंमलबजावणी आजच्या युवकांनी करणं मला जास्त महत्त्वाचं वाटतं...तेव्हाच आजचे युवक जिजाऊंचे युवक म्हणवल्या जातील....!

राष्ट्रीय युवा दिन

# युवकांनो जागे व्हा..!



भारत हा तरुणांचा देश. याच तरुणांच्या विचारावर, शक्तीवर, सामर्थ्यावर येणा-या भारताचे भवितव्य अवलंबून आहे. कदाचीत याचाच विचार करुन माजी राष्ट्रपती स्व.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी 2020 पर्यंत भारत महासत्ताहोईल याचं स्वप्न पाहिले होते. मात्र त्यांच स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी हयात घालवली. मात्र आजच्या तरुण म्हणून घेणा-या किती युवकांनी त्यासाठी किंवा उद्याच्या उज्वल भारतासाठी अथवा स्वतः च्या भविष्यासाठी आपला वेळ खर्च केला याचा विचार करावा. 2024 हे वर्ष सुरु होऊन आज 12 दिवस झाले. यातील पहिला महत्वाचा आणि उर्जा देणारा दिवस म्हणजे युवादिन.

स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस आपण राष्ट्रीय युवक दिन म्हणून साजरा करतो. त्याच अनुषंगाने घेतलेला हा मागोवा. ३१ डिसेंबरच्या रात्री बऱ्याच माझ्या तरुण मित्रांनी पार्ट्या केल्या. डीजे च्या तालावर ठेका देखील धरला असेल. नवीन वर्षाच्या निमित्ताने काही संकल्प सुद्धा केले असतील. पण ज्यांनी तुमच्या तरुणपणाची ताकद पाहत तुमच्याच उज्वल भविष्याकरिता जिवाचं रान केले, ते कलाम यांच्या, नव्हे तुम्हा आम्हा सर्वांच्या स्वप्नांचा विचार केला का?, की आपल्यातील ताकद आपण ओळखू शकत नाही? वेळ निघून जाण्यापूर्वी त्या ताकदीची ओळख करून घ्या. कारण अगोदरच आपण १९ वर्षे खर्च केली. काही जण म्हणतील की, त्याचा आणि माझा संबंध काय? या एकाच विचाराने देश किती तरी पाऊले पुढे येतो. आता वेळ आली आहे. देशासोबत बरोबरी करण्याची. किती दिवस आपण फक्त पाणी, रस्ता, वीज यासाठी मतदान करायचं. मागील १९ वर्षांत बऱ्याच युवकांना मतदानाचा अधिकार देखील मिळाला. या एका हक्कामुळे आपण आपलं योगदान देशहितासाठी नक्कीच देऊ शकतो. आजघडीला ६०-७० टक्के पेक्षा जास्त मतदान कधी झाल्याच आपण पाहिलं नाही. परिणामी या देशाला मूलभूत सुविधे करिता नेहमी मुकावं लागत आहे, लढावं लागत आहे. ही मोठी शोकांतिका आहे. अणुबॉम्ब पडून सुद्धा जपान मधील हिरोशिमा आणि नागासाकी ही शहरे उभी राहून जपान आपल्या किती तरी पुढे निघून गेला. आज ७५ वर्षे उलटून देखील आपल्या गाव, शहरातला रस्ता नीट पहायला मिळत नाही. याला कोण जबाबदार राजकारणी तर नाही.

जेव्हा १०० टक्केमतदान होईल, तेव्हा सरकारवर देखील दबाव येईल. कारण या तरुणांनी हे पुढारी दिलेले असतील. आज २०२४ वर्षांत आपण आहोत. मात्र एकीकडे आजच्या तरुणांकडे पाहिले तर लक्ष्यात येत की, आजचा तरुण हा मोबाइल वेडा झालाय. त्यामुळं बदलाची अपेक्षा ठेवावी कशी हा एक प्रश्न समोर उभा राहतो. आम्ही ज्यांना आदर्शमानतो ते म्हणजे राजकीय नेते. युवकांना हाताशी धरून आपली पोळी शेकण्यात मग्न असतात. पण ज्यांना आदर्श मानावे ते विवेकानंद तुमच्या आमच्या डोक्यातून बाजूला गेलेले आहेत. फक्त नावाला जयंती, पुण्यतिथी लक्षात राहातात. तेवढीच ती आठवण. मात्र त्यांच्या कडून शिकण्यासारखे खूप काही आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर जर गेलात भविष्य नक्कीच सुवर्ण अक्षरात लिहिले जाईल. परदेशात जाऊन विवेकानंद यांनी भाषणाची फक्त सुरुवातच माझ्या बंधू आणि भगिनींनो करून सगळ्या देशाचे लक्ष आपल्याकडे खेचले.

ही जादू फक्त एक युवकंच करू शकतो. पण खंत वाटते आजच्या युवकांच्या प्रती. आजचा तरुण मोबाइल आणि दीड जीबी डेटाच्या आहारी गेल्याने नको, त्या विषयाकडे अधिक ओढला गेला आहे. व्हॉट्स ॲप सारख्या युनिव्हर्सिटी मध्येशिकून जगाला पागल समजणारे बरेच तरुण भेटतील. पण त्याच डेटाचा सदुपयोग करून आपण देशाचं किंवा स्वतः चं हित नक्कीच साधू शकतो. हे मात्र आजचा युवक विसरत आहे. एका रिपोर्ट नुसार जगात नेटचा डाटा वापरणारा देश म्हणून भारत नंबर एकवर आहे. शिक्षणात मात्र, आपण कुठे आहोत याचा पण विचार केला पाहिजे. आज अनेक विद्यापीठातील युवकांना अनेक त्रासाला सामोरे जाव लागत आहे. आजची तरुण मुलं जर प्रश्न विचारणार नाहीत, तर कोण विचारणार? शिक्षण हे वाघिणीच दूध आहे, ते प्यायलेला गुरगुरल्या शिवाय राहणार नाही, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे. आज युवकदिनाच्या अनुषंगाने इथे तंतोतंत लागू पडते. देशातील प्रत्येक युवकाने हे शिक्षणाचे दूध पिऊन तो गुरगुरल्यास देश नक्कीच महासत्ताहोईल यात शंका नाही. त्यामुळे मंदिरात ज्या पद्धतीने दर्शनाच्या रांगा लागतात. तशाच रांगा या ग्रंथालयात देखील लागल्यास, आपण लवकर यश मिळवू, यात किंचित देखील शंका नाही. शेवटी स्वामी विवेकानंदाच्या दोन ओळीं...युवा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**सारी शक्ती ही तुमच्या आत दडली आहे,
तुम्ही काहीही आणि सारे काही करू शकता..**

सुरज कामे
(युवा पत्रकार) ७७७५०००६८९



राष्ट्रीय युवा दिन विशेष

# कापूसवाडी ते छत्रपती संभाजी नगर...

## कल्पतरू उद्योग समूहाच्या माध्यमातून **शेतकरी तरुणांना बळ देणारे तरुण उद्योजक** संजय तांबे पाटील



125 कोटी रुपये वार्षिक उलाढाल करणाऱ्या तरुण युवा **उद्योजकाची यशोगाथा**

AGROWIN

अवघी सातशे लोकसंख्या असलेले पैठण तालुक्यातील एक छोटसं गाव. तेथील बाबासाहेब आणि शकुंतला तांबे हे जेमतेम चार एकर शेतीसह गळ्यात तुळशीची माळ, मुखात हरी नाम असलेलं हे वारकरी जोडपं. त्याकाळी निशिगंध, गुलाब, शेवंती आणि मोगऱ्याची फुलशेती करून संभाजीनगर शहरातील गुलमंडी भागात दुकानात विक्री करायचे. आज फुलशेतीतून चार एकर शेतीची ३० एकर शेती वडिलांनी केली. या सुखवास्तू घरात संजय यांचा जन्म झाला. पहिली ते चौथी गावातल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत, त्यानंतर दहावीपर्यंत बालानगर येथील सरस्वती भुवन महाविद्यालयात शिक्षण झाले. त्यानंतर सुरू झाला खरा संघर्ष. आठशे रुपये महिन्याने सुरू झालेला हा प्रवास अवघ्या १६ वर्षात १२५ कोटी रुपये उलाढालीपर्यंत पोहोचला. त्यांच्या या जिद्दीचा, यशाचा आणि संघर्षाचा प्रवास नैराशयेच्या गर्तेत असलेल्या आजच्या तरुणांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. ही यशोगाथा आहे संजय तांबे पाटील यांची....

श्री. संजय तांबे पाटील यांनी २००१ साली छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील एस.बी सायन्स महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यानंतर बॅचलर ऑफ सोशल सायन्स, मास्टर ऑफ सोशल सायन्स, पी जी डी. एम. एल. टी. आणि पीएचडी पूर्ण केली. शिक्षण करीत असतांना खाजगी कस्तुरे पॅथोलॉजी लॅबमध्ये आठशे रुपये महिन्याने नोकरी सुरू केली. दोन वर्षानंतर २००७ मध्ये शहराच्या मध्यभागी समर्थनगर येथील एसबीएच बँकेकडून चार लाख रुपये कर्ज घेऊन स्वत:ची मंगलमूर्ती पॅथ लॅब सुरू केली. उत्कृष्ट सेवा आणि सुविधेच्या बळावर अल्पावधीतच शहरातील नामांकित लॅब मध्ये गणना होऊ लागली आणि त्यावेळी महिन्याकाठी दोन ते तीन लाख रुपयांपर्यंत उत्पन्न गेले. या काळात खऱ्या अर्थाने आर्थिक दृष्ट्या स्थिरस्थावर झाले. मात्र, शेती, शेतकरी आणि सामाजिक जाणिवा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हत्या. शेतकरी फक्त शेती करीत असायचे पण त्याला शेतीपूरक उद्योगाची जोड देत नव्हते. दुसरीकडे तरुण शेतीपासून दुरावत चालला होता. ही खंत त्यांना सलायची. अखेरीस २०१२ या वर्षात त्यांनी मंगलमूर्ती पॅथ लॅबचे काम थांबवून शेतीपूरक उद्योगाला फॉर्च्यून इंडिया फायनान्सच्या माध्यमातून चालना देण्यास सुरुवात केली. तसेच काही दिवस राजकारणात सक्रिय काम केल्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून बघितले नाही. बघता बघता कल्पतरू फाऊंडेशन, फॉर्च्यून इंडिया ॲग्रोटेक, कल्पतरू अर्थमुव्हर्स, ॲग्रोवीन फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी, संत तुकाराम बहूउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ हे सर्व एकत्रित करून 'कल्पतरू उद्योग समूह' म्हणून नावारूपास आला.

### कल्पतरू फाउंडेशनचे गौरवास्पद कार्य

ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करून अधिकाधिक बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने गेल्या आठ वर्षापासून दरवर्षी रोजगार मेळाव्याचे आयोजन कल्पतरू फाउंडेशनच्या माध्यमातून केले जाते. ते गेल्या दहा ते बारा वर्षापासून राष्ट्रीय ग्रामीण योजनेचे काम करत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. आणि त्याच भावनेतून शेतकरी बेरोजगार बांधवांच्या मदतीसाठी हे त्यांचे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. **कल्पतरू फाउंडेशनचे संजय तांबे पाटील** अशी विशेष ओळख त्यांनी समाजात निर्माण करून ग्रामीण भागाशी नाळ कायम जोडून ठेवली, हे विशेष....!

शेती, माती आणि संस्कृतीसाठी कटीबद्ध... कल्पतरू फाउंडेशन

२०१२ ते २०२४ या काळात कल्पतरू उद्योग समूहाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या मराठवाडा विभागात ५००० हून अधिक तरुण शेतकरी, नव उद्योजक लाभार्थी आहेत. त्यात प्रामुख्याने डाळ मिल, ऑइल मिल, जिनिंग प्रेसिंग, कुक्कुट पालन, वेअर हाऊस, दूग्ध प्रक्रिया उद्योग, शेळी व मत्स्य पालन आणि पॉलीहाऊस यांसारख्या एक ना अनेक शेतीपूरक उद्योगासाठी १५०० हून अधिक शेतकरी तरुणांना राष्ट्रीयकृत बँकांमार्फत सहकार्य केले. तसेच केंद्र सरकारची सबसिडी शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यास त्यांच्या "फॉर्च्यून इंडिया" या फर्म च्या माध्यमातून आजही त्यांचे कार्य सुरूच आहे. मराठवाड्यात त्यांचे नाबार्ड, अपेडा, सिडबी राष्ट्रीय फलोत्पादन चे चांगले आणि तत्पर काम करणारे असा नावलौकिक त्यांनी मिळवला. अप्रत्यक्ष ३००० हून अधिक तरुणांना रोजगार मिळाला. आजघडीला १६ राष्ट्रीयकृत बँकांसोबत व्यावसायिक भागीदार म्हणून ते काम पाहतात. सामाजिक जाणीवा जपणाऱ्या कल्पतरू फाऊंडेशनच्या अंतर्गत रोजगार मेळावे घेऊन २५०० बेरोजगार तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून दिलाय.

एका छोट्याश्या गावातून आलेल्या संजय यांनी आई वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन स्वत:ची प्रगती साधून आपल्यासारख्याच शेतकरी कुटुंबातील तरुणांनाही उद्योग आणि व्यवसायात आणले. ते म्हणतात "उद्योग आणि व्यवसाय करण्यासाठी भांडवला पेक्षा कौशल्य आणि प्रबळ इच्छाशक्तीची आवश्यकता असते. त्याचबरोबर कुठल्याही कामात सातत्य ठेवल्यास यश नक्कीच मिळते. यशाचे ध्येय गाठण्यासाठी कुठलाही शॉर्टकट नसतो."

त्यांच्या या कर्तुत्ववान प्रवासाला आमचा सलाम.

झेंडा भल्या कामाचा जो घेउनि निघाला,
काटंकुटं वाटंमंदी बोचति त्येला,
रगत निगंल, तरि बि हंसल, शाबास त्येची.
तू चाल पुढं तुला रं गड्या भीति कशाची...
पर्वा बी कुनाची...












# क्राफ्टीस्ट अँड आर्टीस्ट

## कोमल नारायण बंसवाल









निरागसता प्रत्येक लहान मुलांच्या ठायी ठायी भरलेली असते. त्यांच्या चेहऱ्या वरील एक लहानसं स्मितहास्य जगण्याची नवी उर्जा निर्माण करणारे असते म्हणूनच त्यांच्या या जगात आपण कितीही मोठे झाले तरीही लहानच राहावे आणि त्यांच्या विश्वात कायम रममाण व्हावे असेच प्रत्येक व्यक्तीला वाटते. या लहान मुलांची हि दुनियाच वेगळी असते. न कोणती चिंता, ना कोणते भय म्हणूनच आपल्यालाही कधी कधी असे वाटते की आपणही असे लहानच राहायला पाहिजे होते. पण असे कधी होणार नाही मात्र त्या लहान मुलांच्या जगात आपले बालपण आपण शोधून थोडा काळ का होईना लहान होऊ शकतो... त्यांच्या सोबत खेळू शकतो... त्यांच्या आनंदात सहभागी होऊन त्यांच्या त्या निरागस बालपणाची जोड आपल्याही जुन्या आठवणी आणि बालपणाला देऊ शकतो... लहान मुलांच्या या बाल विश्वाला एका कलेची जोड देऊन त्यांना एक चांगला कलावंत घडवण्याचे काम अशीच एक जिजाऊ ची लेक शिक्षिका म्हणून छत्रपती संभाजी नगर मध्ये करत आहे ती म्हणजे क्राफ्टीस्ट अँड आर्टीस्ट...कोमल नारायण...



ज्या भावना, जे विचार शब्दांत सांगता येत नाहीत व मांडता येत नाहीत ते अनेकदा कलेच्या माध्यमातूर व्यक्त करणे जास्त परिणामकारक होते. कलेमुळे आपले जीवन आनंदी व समृद्ध होते. कलेच्या माध्यमातून लोक एकत्र येतात आणि त्यातून परस्परांबद्दलचा आदर वाढतो. जगण्यातील सौंदर्य वाढवण्याची वृत्ती तयार होते. आपण स्वत :लाही चांगल्या प्रकारे ओळखू शकतो. कोणत्याही समाजामध्ये मग तो सुशिक्षितांचा, अशिक्षितांचा मागासलेला किंवा सुसंस्कृत पुढारलेला असो, कलानिर्मिती है लोकजीवनाचे एक आवश्यक अंग बनले आहे. कलेचा विकास हा कोणत्याही शास्त्रीय प्रगतीवर अवलंबून नाही. अगदी प्राचीन काळातही इजिप्त मेसोपोटेमिया भारत, चीन, ग्रीस, इ. देशांमधील मानव प्रगत नसतानाही कलाक्षेत्रात त्यांनी आश्चर्यकारक कामगिरी केल्याचे दिसून येते.

शिवछत्रपती महाविद्यालयातून पदवी चे शिक्षण घेतल्या नंतर कोमल नारायण हिने विविध शाळांमध्ये शिक्षिका म्हणून खाजगी नौकरी सुरु केली. शाळेतील लहान मुलांचे, त्यांच्यातील सुप्त गुण यानिमित्ताने तिला ओळखता आले. लहान मुलांना काय आवडते हे जाणून घेत त्यांना कलेची आवड निर्माण झाली पाहिजे हे ओळखत कोमल ने क्राफ्ट म्हणजेच हस्तकलेतून लहान मुलांची बौद्धिक क्षमता निर्माण केली. शाळेच्या अभ्यासक्रमात हस्तकलेचा विषय असला तरी त्या लहान मुलांना या कलेचे महत्व कळले पाहिजे यासाठी "टाकाऊ पासून टिकाऊ" या वस्तू तयार करण्यासाठी तिने अधिक लक्ष केंद्रित केले. आपल्या घरातील जुने कपडे, व्हिजिटिंग कार्ड, विविध निमंत्रण पत्रिका तसेच ज्या निरुपयोगी वस्तू असतील त्यापासून नवीन काही तरी चांगले आणि टिकाऊ निर्माण करण्याचे तिने, आपल्या शाळेतील अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना शिकवला आणि तो छंद म्हणूनही जोपासला... लहान विद्यार्थ्यांना शिकवत आज कोमल ने बनवलेले क्राफ्ट विशेष आकर्षण ठरत असून अनेक ठिकाणी तिने निर्माण केलेल्या क्राफ्ट ची मागणीही होत आहे.

● **टीम लाईव्ह महाराष्ट्र**, छत्रपती संभाजीनगर













LIVE महाराष्ट्र 24x7

'लाईव्ह महाराष्ट्र 24x7' हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक सचिन सुखदेव अंभोरे यांनी हरिओम प्रिंटर्स, सिडको टाऊन हॉल, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथे खाजगी वितरणासाठी छापून सचिन मल्टीमिडिया, द्वारिका कॉम्पलेक्स, पी-२३, एन-१, सिडको टाऊन सेंटर येथे प्रकाशीत केले. ई-मेल. livemaharashtra247@gmail.com मो. 9970409640











**परफेक्ट मायक्रो प्लॅनर**

# सामाजिक कार्यातील 'युगंधर'

## हर्षदा संजय शिरसाट

युगंधर
सेवाभावी प्रतिष्ठान
छत्रपती संभाजीनगर

आपल्या घरातील संस्कार, परंपरा, आणि आपण करत असलेले काम जर आपल्या मुलीने ताकदीने जोपासत ते पुढे नेले तर यासारखा अभिमान जगातील कोणत्याही वडिलांकडे नसेल. सर्वसामान्य, गरीब, मजूर, महिला व नागरिकांची निस्वार्थपणे अहोरात्र सेवा करण्याची, तसेच त्यांना आपली मदत पोहचवण्याची जबाबदारी घेत वडिलांचा वारसा पुढे नेणारी छत्रपती संभाजीनगर युगंधर प्रतिष्ठानची अध्यक्ष आणि मां साहेब जिजाऊ ची लेक म्हणजे हर्षदा संजय शिरसाट...

पश्चिम मतदार संघाचे आमदार संजय शिरसाट यांच्या प्रत्येक सामाजिक राजकीय कामात वडिलांना मदत व्हावी म्हणून हर्षदा संजय शिरसाट युगंधर प्रतिष्ठान च्या माध्यमातून आपले कार्य गेल्या अनेक वर्षापासून करत आहे. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आस्थेवाईकपणे विचारपूस करून त्यांची अडचण हर्षदा समजून घेते. त्यांच्या चेहऱ्यावरील दु:ख काही क्षणात दूर करून कार्यालयात आलेला आजवर चा एकही व्यक्ती रिकाम्या हाताने कधीच परत गेला नाही हे विशेष. स्वत: आमदार संजय शिरसाट हे आपल्या मुलीचे कौतुक करताना सांगतात की, माझी मुलगी म्हणजे माझा अभिमान आहे. ती करत असलेले प्रत्येक काम मला माझ्या कामात ऊर्जा देणारं आहे. युगंधर प्रतिष्ठान च्या माध्यमातून तिने निर्माण केलेली ओळख ही तिची स्वत:ची स्वतंत्र ओळख आहे आणि याचा मला अभिमान आहे असेही आमदार संजय शिरसाट आपल्या लेकीबद्दल सांगतात. अनेक ठिकाणच्या कार्यक्रमामुळे संपर्क झालेले नागरिक "हर्षदा ताई खुप चांगले काम करते" असे जेव्हा सांगतात तेव्हा आमदार संजय शिरसाट यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित होतो, हे अनेकांनी प्रकर्षाने अनुभवले आहे. पश्चिम मतदार संघात कार्यसम्राट आमदार म्हणून संजय शिरसाट यांची ओळख असली तरी, " हर्षदा ताई आमची हक्काची" अशीही साद नागरिकांकडून ऐकायला मिळतेच...











जिजाऊंच्या लेकी

### विविध विकासकामे करण्याकडे प्राधान्य

आपल्या वडिलांच्या माध्यमातून, युगंधर प्रतिष्ठान च्या वतीने सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक यासह शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा यासह विविध विकासकामे करण्याकडे हर्षदा ताई चे प्राधान्य असते. हाती घेतलेले काम पूर्ण झालेच पाहिजे यासाठी हर्षदा ताई पाठपुरावा करण्यात कधीही मागे हटत नाहीत हे विशेष... आपल्यातील स्वभावामुळे हर्षदा ताई ने आपली एक वेगळी ओळख तर निर्माण केलीच आहे पण त्याहुनी अधिक तिने चांगली माणसे, महिला, युवती, युवक विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांना आपल्याशी जोडले आहे. कुणाचे कोणतेही काम असो, ते पूर्ण झाल्याशिवाय हर्षदा ताई स्वस्थ बसत नाही हा विश्वास प्रत्येकामध्ये निर्माण करण्याचे काम हर्षदा ताई ने आपल्या कामातून निर्माण केले आहे. राजकिय क्षेत्रातील ओळख तर आहेच पण याशिवाय मराठी चित्रपट कलावंत, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, शैक्षणिक, अध्यात्मिक, या क्षेत्रातही हर्षदा ताई ने आपला दांडगा जनसंपर्क जोडला आहे.

युगंधर प्रतिष्ठान च्या माध्यमातून प्रत्येक कार्यक्रमांचे व्यवस्थापन करून तो अधिक लोकप्रिय कसा होईल याचे "परफेक्ट मायक्रो प्लॅनिंग" हर्षदा ताई कडे तयार असते हे विशेष... ● **टीम लाईव्ह महाराष्ट्र**, छत्रपती संभाजीनगर

### मराठवाड्यातील पहिली पायलट होण्याचा बहुमान....

परदेशात यु एस मध्ये शिक्षण घेऊन हर्षदा ताई ने मराठवाड्यातील मागासवर्गयां मध्ये पहिली पायलट होण्याचा बहुमान मिळवला आहे. उच्चशिक्षण घेऊन घरातील संस्कार कायम पुढे नेणारी महापुरुषांच्या विचारांना आत्मसात करणारी आणि तेवढ्याच ताकदीने प्रत्यक्षात कृती करणारी ...हक्काची ताई ... लाडकी ताई ... आपली ताई म्हणजे हर्षदा ताई ....!



●छत्रपती संभाजीनगर
●शुक्रवार,
दि.१२ जानेवारी २०२४




## कार्यसम्राट आमदार संजय शिरसाट यांच्या संकल्पनेतून साकारतेय

# माँसाहेब जिजाऊ स्मारकाचे ऐतिहासिक प्रवेशद्वार





राजमाता माँसाहेब जिजाऊ स्मारक येथे प्रवेशद्वार उभारणे व सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कार्यसम्राट आमदार संजय शिरसाट.

छत्रपती संभाजीनगर (दि.१२) : ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रवेश करताना येणाऱ्या प्रत्येकामध्ये ऊर्जा व प्रेरणा देणारे राजमाता, राष्ट्रमाता माँसाहेबजिजाऊस्मारकया ऐतिहासिक प्रवेशव्दाराचा भूमिपूजन सोहळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते १९ सप्टेंबर २०२३ रोजी जिजाऊ चौक, केंब्रीज येथे पार पडला. त्यानंतर भूमिपूजन प्रवेशद्वाराच्या प्रत्यक्ष कामाचे शनिवार, दि.२५ नोव्हेंबर २०२३ रोजी शिवसेना प्रवक्ते तथा आमदार संजय शिरसाट यांच्या हस्ते पूजन करून विकासकामाची सुरुवात करण्यात आली.

सुंदरवाडी जवळील उड्डाण पुलालगत असलेल्या जिजाऊ चौकात हे भव्य दिव्य प्रवेशद्वार लवकरच साकारणार असून शहरात येणाऱ्यांच्या स्वागतासाठी लक्षवेधी ठरणार आहे. राजमाता, राष्ट्रमाता माँसाहेबजिजाऊस्मारकप्रवेश द्वाराचे वैशिष्ट्य असे की, वेरूळ हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ आणि सिंदखेड राजा हे देखील शिवाजी महाराज यांचे आजोळ असून या दोन्ही शहराला जोडणारे हे प्रवेशद्वार ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार ठरणार आहे.

या कामासाठी आमदार संजय शिरसाट यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी करून नगरविकास खात्याच्या माध्यमातूनराजमाता, राष्ट्रमाता माँसाहेबजिजाऊस्मारक प्रवेशद्वारछत्रपती संभाजी नगरात उभारणे व सुशोभीकरण करणे या कामाकरिता ५ कोटींचा निधी उपलब्ध करून घेतला होता. तसेच या भूमिपूजन झालेल्या प्रवेशद्वाराचे आर्किटेक यांच्या माध्यमातून 3D असे डिझाईन करून या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, उपजिल्हाप्रमुख रमेश बाहुले, उपशहरप्रमुख राजू राजपूत, विकीराजे पाटील, राम मंदिर ट्रस्टचे मनसुटे काका, बापू शिरसाठ, ज्ञानेश्वर मोहिते किरण चिखले, विजया पवार, उषा कदम, शुभ्र कदम, ॲड. सुवर्णा मोहिते, नितीन देवतवाल, अनिल चव्हाण, अनंत भोसले, भाऊसाहेब थोरात, शुभम बिल्लोरे, अरुण हिवाळे, प्रल्लाद भुसारे पा, मायकल शिंदे, रणजित निकम, सागर गायकवाड यांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन

या कामासाठी आमदार संजय शिरसाट यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी करून नगरविकास खात्याच्या माध्यमातून राजमाता माँसाहेब जिजाऊ स्मारक येथे प्रवेशद्वार उभारणे व सुशोभीकरण करणे या कामाकरिता ५ कोटींचा निधी उपलब्ध करून घेतला. तसेच भूमिपूजन झालेल्या या प्रवेशद्वारचे आर्किटेक च्या माध्यमातून ३-D असे डिझाईन करून घेत मुख्यमंत्री शिंदे यांना सादर केले, भूमिपूजन प्रसंगी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आमदार संजय शिरसाट यांनी या प्रवेशद्वारासाठी माझ्याकडे निधीची मागणी केली. आपल्याला हे प्रवेशद्वार व सुशोभीकरण करावे लागणार आहे. यासाठी मला निधी उपलब्ध करून द्या. मी कुठलाही विचार न करता निधी उपलब्ध करून दिला. ३-D च्या माध्यमातून या चौकाचे छान असे डिझाईन करून राजमाता, माँसाहेब जिजाऊ स्मारक प्रवेशद्वार व सुशोभीकरण होणार आहे. ज्या माँसाहेब जिजाऊ यांनी स्वराज्यरक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविले. त्यांचे स्मारक व प्रवेशद्वार आपल्या येणाऱ्या पिढीला माँसाहेब जिजाऊ कोण होत्या याची माहिती होईल. आणि त्यांची असलेली शिकवण आत्मसात करून पुढच्या पिढीला चालना मिळेल आणि जेव्हा हे प्रवेशद्वार व सुशोभीकरण पूर्ण होईल तेव्हा त्याच्या उदघाटनाला मी नक्की येईल अशी ग्वाही उपस्थित असलेल्या सर्व जिजाऊ, शिवशंभूप्रेमीना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



स्वप्न पूर्ण करण्यासाठी

# रात्रीचा दिवस

## ए.पी.जे.अब्दुल कलामांचे होते स्वप्न...

आज युवादिन अर्थातच युवकाचं प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती. उघड्या डोळ्यांनी स्वप्न पाहणे आणि ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी रात्रीचा दिवस करून अपार कष्ट घेणे याची हिंमत असतो तो युवक. 'लाथ मारीन तिथं पाणी काढीन' हा आत्मविश्वास मनात बाळगून अशक्य गोष्टी शक्य करण्याची ताकद ज्याच्यात असत तो युवक. केस पिकले असले तरी, शरीराने वृद्ध असले तरी मनान उत्साहित, कुठल्याही कार्यासाठी सदैव कार्यतत्परता असतो, तो खरा युवक. होय, हे अगदी खरे आहे...

ऊन, वारा, पाऊस सारे, असे दुबळ्यांसाठी...
रे युवकांनो, तुमच्या पुढती, झुकेल अंबर, धरती...

नाना प्रकारच्या आमिषांना, व्यसनांना बळी न पडता आपली ऊर्जा सकारात्मक देशकार्यासाठी, समाजहितासाठी वापरण्याची नैतिकता ज्याच्यात असते, तो खऱ्या अर्थाने देशाचा युवक होईल, देशाचा आधारस्तंभ होईल. असे युवक ज्या देशात ज्या समाजात अधिक तो देश तो समाज अधिक बलवान होईल. आपला भारत देश आज जगातील सर्वात तरुण युवा देश आह. कारण आपल्या या देशात युवकाची संख्या या सर्वाधिक आहे. कदाचित याच आत्मविश्वासाच्या जोरावर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यानी भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहिले.

राष्ट्रीय युवा दिन










१२
जानेवारी
राजमाता जिजाऊ व
स्वामी विवेकानंद जयंती
तसेच
राष्ट्रीय
युवा
दिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
SUSAM
INFRASTRUCTURE
सुबोध सतीश तुपे


१२
जानेवारी
राजमाता जिजाऊ व
स्वामी विवेकानंद जयंती
तसेच
राष्ट्रीय
युवा
दिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
TEJAL
BUILDERS & DEVELOPERS
JSB
जयेश संदीप बोरसे